
घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध व्हा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द तूप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

Post Regd.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२३९ ■ मंगळवार २ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४



भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


## शिक्षणाचा धंदा केला जातो तेव्हा चुकीत सुधारणा होत नाही
## सीबीएसईची चूक, शिक्षा मुलांना, कमाई सरकारची : गांधी

**नवी दिल्ली, दि. १ : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सीबीएसईच्या निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. त्यांनी दावा केला की, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका स्वयंचलित रोबोटिक स्कॅनरऐवजी मोबाईल फोनने स्कॅन करण्यात आल्या. विद्यार्थी सार्थक सिद्धांतची एक पोस्ट शेअर करत राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टीमची निविदा ऑगस्टमध्ये पुन्हा जारी करण्यात आली होती. त्यावेळी अनेक अटी काढून टाकण्यात आल्या आणि स्कॅनिंगची गुणवत्ता ३०० डीपीआयवरून २०० डीपीआयपर्यंत कमी करण्यात आली. राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, अस्पष्ट उत्तरपत्रिका, गहाळ झालेली पाने आणि अनेक प्रती स्कॅन न होणे या केवळ तांत्रिक चुका नाहीत. त्यांच्या मते, एका विशिष्ट विक्रेत्याला फायदा व्हावा यासाठी केलेल्या कराराचा हा परिणाम आहे.**



यासंबंधी राहुल गांधी म्हणाले की, ही एक फसवणूक आहे. ज्यात प्रत्येक विद्यार्थ्याचे गुण चुकीच्या पद्धतीने मोजले गेले आहेत. तो या फसवणुकीचा बळी आहे. धर्मेंद्र प्रधान आपल्या पदावर कायम आहेत. मोदींचे मौन आता केवळ उदासीनता राहिलेली नाही. ते या गुन्ह्यातील त्यांच्या सहभागाचे द्योतक आहे. जेव्हा शिक्षणाला सेवेऐवजी धंद्यात बदलले जाते, तेव्हा चुका सुधारल्या जात नाहीत. त्या अधिकच वाढतात आणि याची अंतिम किंमत आपली मुले वेळ, आत्मविश्वास आणि भविष्य गमावून मोजत आहेत.

**स्कॅनिंगमध्ये चुकीचा फोटो**


विद्यार्थी सिद्धांत कुमारने कथितरित्या स्कॅन केलेल्या प्रतींचे फोटो शेअर केले. त्याने लिहिले की, सीबीएसई म्हणते की या प्रती स्कॅन करण्यासाठी स्कॅनर वापरले. आता या प्रती सार्वजनिक पाहण्यासाठी उपलब्ध झाल्या आहेत. कृपया स्पष्ट कराल का की स्कॅन केल्यावर कोणत्या प्रतींना ड्रॉप शॅडो आली आहे? आणि या तीन घड्या कशा पडल्या? (पान ४ वर)

## उष्णतेची लाट ओसरली देशात दिलासा मिळाला

नवी दिल्ली/ पुणे, दि. १ : देशातील बहुतांश भागांमध्ये रविवारी पाऊस आणि ढगाळ वातावरणाफुळे तापमानात घट नोंदवली गेली. भारतीय हवामान विभागाच्या मते, देशभरात उष्णतेची लाट संपली आहे. अनेक राज्यांमध्ये पाऊस आणि वादळामुळे हवामानात बदल झाला आहे. परिणामी, उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

राजस्थानच्या अनेक भागांमध्ये सलग दुसऱ्या दिवशी धुळीचे वादळ आले. ज्यामुळे तापमानात घट झाली. जैसलमेरमध्ये वाळूचे वादळ आले. यामुळे दृष्यमानतेवर परिणाम झाला. मात्र, कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. राज्यातील फालोदी येथे कमाल तापमान ४१.६ अंश नोंदवले गेले. उत्तर प्रदेशातील बलिया येथे ३४.४ मिमी आणि मुरादाबाद येथे २१.८ मिमी मीटर पाऊस झाला. लखनौमध्येही (पान ४ वर)

## विधानपरिषदेच्या सतरा जागांसाठी लढती ठरल्यात
## संघर्ष मात्र भाजप महायुती-महाविकास आघाडीत



**मुंबई, दि. १ : राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अखेर आज उमेदवारी अर्ज भरण्यात आले. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत होणार आहे. मात्र, जवळपास सर्वच मतदारसंघात काही नेत्यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. परिणामी, एकाच जागेसाठी अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र, प्रमुख लढत ही महायुतीचे उमेदवार विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्यातच होणार आहे. महायुतीमध्ये भाजप ११ जागांवर निवडणूक लढवत असून शिंदेंची शिवसेना चार जागांवर मैदानात आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसला जागा वाटपात दोन जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीचा विचार केल्यास, काँग्रेस सर्वाधिक आठ जागांवर निवडणूक लढवत आहे, ठाकरेंची शिवसेना सहा जागांवर उमेदवार देत असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तीन मतदारसंघात उमेदवार दिले आहेत. त्यामुळे, या सर्व जागांवरील प्रमुख लढती आता निश्चित झाल्या असल्या तरी खरे चित्र चार जून रोजीच स्पष्ट होणार आहे.**

विधान परिषदेच्या सतरा जागांसाठी निवडणूक होत असून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली. सोलापूर ते संभाजीनगर आणि जळगाव ते नागपूरपर्यंत एकूण सतरा मतदारसंघातील उमेदवारांची नावे आता समोर आहेत. राज्यातील सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड- रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर (पान ४ वर)

## पावणे दोन लाखांची नशेची पावडर विकणाऱ्या तरुणाला केले जेरबंद

**धुळे, दि.१- शहरातील पारोळा रोड चौफुलीजवळ नशेची पावडर विक्री करणाऱ्या तरुणाला दि.३१ मे रोजी रात्री जेरबंद करण्यात आझाद नगर पोलीसांना यश आले आहे. अटक केली. त्याच्याकडून एक लाख अडुसष्ट हजार रुपये किंमतीची एमडी ड्रग (पावडर) जप्त केली. एन. डी.पी. एस. कायद्यान्वये आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

पारोळा रोडवरील कमानीजवळ एक जण अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती आझादनगर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस ठाण्याच्या पथकाने रविवारी रात्री सापळा रचला. पोलिसांनी संशयित रईस खान असगर खान पठाण (वय ३०) रा. दिलदार नगर, मनोहर चित्रपट गृहामागे याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे उग्र गंध असलेली क्रिम रंगाची क्रिस्टल एम.डी. नावाची अंमली पावडर मिळाली. फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने खात्री केली असता एकूण ८.४०० मिलिग्रॅम वजनाचे ४ लहान-मोठे पारदर्शक प्लास्टिक पाऊच सापडले. बाजारभावानुसार जप्त अंमली पावडरची किंमत एक लाख अडुसष्ट हजार रुपये आहे. पोलिसांनी (पान ४ वर)




## अठ्ठावीस ई-बस धुळे शहरात दाखल होणार
## खा.डॉ.बच्छावांची अधिकाऱ्यांसह पाहणी

**धुळे, दि.१- धुळे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणणाऱ्या ई-बस प्रकल्पाला वेग आला असून शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या २८ अत्याधुनिक ई-बस लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहेत. या प्रकल्पासाठी शासनाकडून सुमारे सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्याअंतर्गत ई-बस चार्जिंग स्टेशनसह आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. प्रगतीपथावर असलेल्या ई-बस प्रकल्पाची पाहणी खा.डॉ.शोभा बच्छाव यांनी मनपातील अधिकाऱ्यांसमवमेत केली.**

मोहाडी येथील रेसिडेन्सी पार्कजवळील सुमारे २.५० हेक्टर जागेवर अत्याधुनिक ई-बस चार्जिंग स्टेशन, बस पार्किंग परिसर, तांत्रिक सुविधा तसेच प्रशासकीय कक्ष उभारण्यात येत आहेत. या प्रकल्पाचे काम सध्या अंतिम टप्प्यात असून सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. या पार्श्वभूमीवर धुळे लोकसभेच्या खा.डॉ. शोभा बच्छाव यांनी महानगरपालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रकल्पस्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी चार्जिंग स्टेशन, बस पार्किंग व्यवस्था, विद्युत यंत्रणा तसेच इतर पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत माहिती सादर केली. धुळे शहरासाठी मंजूर झालेल्या २८ ई-बस शहरातील ९ विविध मार्गांवर सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे शहरातील विविध भागांतील नागरिकांना अधिक सुलभ, (पान ४ वर)

## इराणच्या रडार-ड्रोन नियंत्रण केंद्रांवर अमेरिकेकडून हल्ला ; तणाव वाढणार

**तेहरान, दि. १ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणसोबत करार झाल्याचा दावा करत असताना दुसरीकडे मात्र दोन्ही देशांमधील लष्करी संघर्ष वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेच्या सैन्याने तेहरानच्या डॅान कमांड तळांवर जोरदार हल्ले केल्याचे वृत्त आहे. अमेरिकेने या आठवड्याच्या शेवटी इराणच्या गोरुक आणि केशम बेटांवरील रडार आणि ड्रोन नियंत्रण केंद्रांना लक्ष्य केल्याची माहिती समोर आली आहे.**



अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर या कारवाईची माहिती दिली. इराणने आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीवरून उड्डाण करणारे अमेरिकेचे एमक्यू- हे ड्रोन पाडल्याचे सेंटकॉमने म्हटले आहे. इराणच्या या कारवायांना प्रत्युत्तर देण्यासाठी आणि स्वसंरक्षणासाठी अमेरिकेने हे हवाई हल्ले केले. या कारवाईत अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी इराणची हवाई सुरक्षा प्रणाली, एक भू-नियंत्रण केंद्र आणि (पान ४ वर)

## सर्वोच्च न्यायालयात पाच नवीन न्यायाधीश नियुक्त

नवी दिल्ली, दि. १ : केंद्र सरकारने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात पाच नवीन न्यायाधीशांची नियुक्ती केली आहे. केंद्रीय कायदा मंत्रालयाकडून सोमवारी सकाळी यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली.

या अधिसूचनेनुसार, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्त झालेल्यांमध्ये ज्येष्ठ वकील व्ही. मोहना, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती शील नागू यांचा समावेश आहे. याशिवाय मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि (पान ४ वर)

## बहिणीशी प्रेमविवाह दोघांनी एकास चोपले

नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- प्रेम विवाहाच्या प्रकरणातून एकास दोघांनी मारहाण केल्याची घटना सोनार खुंट येथील एका खासगी दवाखान्यात घडली.या मारहाणीत वीस वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत. खुनाचा प्रयतक्नाखाली दोघांच्या विरोधात शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फरहान रफिक कुरेशी याची बहिण सानिया हिच्याशी मुजाफर युसुफ बेलदार याने प्रेम विवाह केला. याचा राग सानियाच्या भावाला होता. सानिया ही आपल्या पती सोबत डॉ लांबोळे यांच्या दवाखान्यात आली असता फरहान कुरेशी व त्याचा मित्र अंजार जूबेर मोमीन या दोघांनी धारदार चाकूने वार केला.यात वीस वर्षीय मुजाफर युसुफ बेलदार हा गंभीर जख्मी झाला. ३० मे रोजी रात्री साडे वाजेच्या सुमारास ही मारहाण करण्यात आली.मपोसई विजया वसावे यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.



## कचरा निर्माण करणाऱ्या फेरीवाल्यांवर मनपाच्या आरोग्य विभागाची कारवाई

**धुळे, दि.१- महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील साक्री रोडवरील कचरा निर्माण करणारे आस्थापना, फेरीवाले व भाजी विक्रेते यांच्यावर कचरा संकलनासाठी डस्टबिन नसल्याबाबत आरोग्य विभागामार्फत धडक कारवाई करण्यात आली. ही कारवाई सहा.आयुक्त डॉ.सोनाली देवरे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली.**

मनपाचे आयुक्त नितीन कापडणीस यांनी शहरातील रहिवासी क्षेत्रात एक वेळेस व व्यावसायिक भागात दोन वेळेस कचरा संकलन करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे उपायुक्त हेमंत निकम यांनी सर्व स्वच्छता निरीक्षक यांना घंटागाडी संबंधित आस्थापनाच्या वेळेवर जाण्याबाबत नियोजन करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार घंटागाडी दोन्ही सत्रात आस्थापनाच्या वेळेनुसार शहरात घंटागाडीद्वारे कचरा संकलन करण्यात येत आहे.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ नुसार शहरातील प्रत्येक नागरिकांनी व आस्थापनांनी आपला कचरा डस्टबिनमध्ये (पान २ वर)

## धरण व शिवार गाळमुक्तीचे फायदे शेतकऱ्यांना होणार
## नंदुरबार जिल्ह्यात जलसाठे वाढणार- अभियंता गिते

**नंदुरबार, दि.१(प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेला नंदुरबार जिल्ह्यात लक्षणीय वेग मिळाला असून जलसंधारणासोबतच शेती उत्पादनवाढ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. जिल्ह्यातील धरणे, तलाव, बंधारे आणि कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ काढण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता हरिभाऊ गिते यांनी दिली आहे.**



जिल्हा प्रशासन, मृद व जलसंधारण विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपंचायती यांच्या संयुक्त समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. अनेक गावांमध्ये स्वयंसेवी संस्था पुढाकार घेऊन ट्रॅक्टर आणि डंपरच्या सहाय्याने जलाशयांमधील गाळ शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचवत आहेत.

या गाळामध्ये सेंद्रिय घटक, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि विविध खनिजे मोठ्या प्रमाणात असल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होत आहे. परिणामी, रासायनिक खतांवरील खर्च कमी होत असून शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होत आहे. त्याचबरोबर पीक उत्पादन आणि जमिनीची उत्पादकता वाढण्यासही मदत मिळत आहे.

योजनेअंतर्गत आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करण्यात आला असून अनेक जलसाठ्यांची पाणी साठवण क्षमता वाढली आहे. त्यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात अधिक पाणी साठवले जाणार असून उन्हाळ्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार आहे. गाळ काढल्यामुळे जलाशयांमध्ये पुन्हा साठवण क्षमता निर्माण होत असून भूजल पातळी वाढीसही या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम होत आहे. (पान २ वर)


## शिक्षकासह एकाला लुटणाऱ्या टोळीतील तिघांची नावे निष्पन्न, एकास पकडले

**धुळे, दि.१- खोरी- जामदा (ता. साक्री) शिवारात बारा ते चौदा जणांच्या टोळीने एका शिक्षकासह त्यांच्या मित्राला चाकूचा धाक दाखवून मारहाण केली. रोकडसह एक लाख वीस हजार रुपये ऑनलाईन लुटल्याप्रकरणी संशयितांविरुद्ध निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल.**

स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने तपासाला वेग देत अवघ्या आठ तासात एकाला तात्काळ अटक केली. एकूण तीन संशयितांची नावे निष्पन्न झाली.

शिक्षक अनिल उमरावसिंग बोडाणा (वय ३५) रा. रुपाखेडी, लाल माता मंदिरासमोर, उज्जैन, म. प्रदेश यांनी एक लाखाचे तीन लाख देवू, अशी रील सोशल मीडियावर आलेली होती. शिक्षकाने रीलमध्ये दिलेल्या मोबाईलवर संपर्क साधला. पलिकडील व्यक्तीने त्यांना खोरी-जामदा शिवारात येण्यास सांगितले. त्यानुसार दि.३० मे रोजी मध्यरात्री दोन नंतर शिक्षक अनिल बोडाणा एका मित्रासह साक्री तालुक्यात आले. त्यावेळी दोघांना काहींनी निजामपूर पासून काही अंतरावर असलेल्या निर्जनस्थळी बोलावले. तेथे शिक्षकाच्या गळ्याला चाकू लावून दमदाटी केली. दोघांना हाताबुक्क्यांनी, बेल्टने मारहाण केली. संशयितांनी मोबाईल फोन पे च्या (पान २ वर)


# १४ वे पुण्यस्मरण



**स्व. अजय गोपालदास गिंदोडीया**

(स्वर्गवास दि. ०२/०६/२०१२)

*बिछड गये बीच राहों मे,*
*आप दिलसे ना जा पाओगे,*
*आँखो मे आँसु हैं गमके,*
*आप उम्रभर याद आओगे ।।*

✻ शोकाकुल ✻

अनिल गिंदोडीया दिपक गिंदोडीया
रवि गिंदोडीया प्रथमेश अजय गिंदोडीया

✻ फर्म - गोपालदास दगडूलाल गिंदोडीया एवंम् गिंदोडीया परिवार

**खंडेराव बाजार मित्र मंडळ,धुळे**


## शिरपूर मर्चंट बँक गैरव्यवहार मुख्य आरोपीस एलसीबीकडून अटक

**धुळे, दि.१ - शिरपूर मर्चंट बँकेच्या गैरव्यवहारातील मुख्य आरोपीस स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलीस पथकाने आज अटक केली. दि शिरपूर मर्चंट को-ऑप बँक लि. शिरपूरचे लेखापरिक्षक यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शिरपूर शहर पोलीस ठाण्यात २५ मेस वाढीव कलम महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हित संबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.**

गुन्हयात एकुण ४६ बँकेचे अधिकारी, कर्मचारी, चेअरमन व कर्जदार आरोपी यांनी एकुण १३ कोटी ७५ लाख ७६ हजार २५३ रुपयांचा गैरव्यवहार करुन बँकेचे सभासद व ठेवीदार यांची आर्थिक फसवणुक केली. गुन्हा दाखल होताच संशयित फरार झालेले होते. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांचे आदेशाने गुन्हयाचा तपास उपअधीक्षक विश्वजीत जाधव, प्रभारी अधिकारी आर्थिक गुन्हे शाखा, धुळे यांचेकडे सोपविण्यात आला.

गुन्हयातील आरोपींनी अटकपूर्व जामीन मिळावा म्हणुन जिल्हा न्यायालयात आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठात अर्ज दाखल केले. न्यायालयाने त्यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले आहेत. गुन्हयातील आरोपींचा आर्थिक गुन्हे शाखा, धुळे येथील पथक शोध घेत असतांना आज गुन्हयातील मुख्य आरोपी संजय केशवराव कुलकर्णी, (वय-५६) व्यवस्थापक-दि शिरपूर मर्चंट को-ऑप बँक लि. शिरपूर, (रा. दगडी आड चौक, बालाजी मंदिरा मागे, वरचेगाव, शिरपूर) यास शिरपूर येथून ताब्यात घेत अटक केली. अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे व पोलीस उपअधीक्षक विश्वजीत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अमोल देवढे, सविता गवांदे, हवालदार रविंद्र माळी, प्रभाकर बैसाणे, श्रीकांत पाटील, गणेश खैरनार व विलास पाटील यांनी कारवाई केली.


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,40,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,62,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



**सेंद्रिय जांभुळ**



संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध

✻ संपर्क ✻

वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६



# भावपुर्ण श्रद्धांजली



कै.जिभाऊसो.श्रावण वेडू सोनवणे
संचालक, खान्देश एज्यूकेशन सोसायटी
तामसवाडी ता.साक्री जि.धुळे
(मृत्यू दि.२७/०७/२०११)

कै.सौ.भटाबाई श्रावण सोनवणे
शेवाळी ता.साक्री जि.धुळे
(मृत्यू दि.०२/०९/२००९)

शुन्यामधुनी विश्व निर्मुनी.. किती सुगंधी वृक्ष फुलवूनी लोभ माया, प्रिती देवूनी... सत्य सचोटी मार्ग दावूनी.. अमर झाला तुम्ही जीवनी...!

- शोकाकुल -

प्रा.श्री.प्रकाश श्रावण सोनवणे
चेअरमन- का.एज्यु.सोसा.तामसवाडी
प्रा.डॉ.रत्नमाला प्रकाश सोनवणे
श्रीमती.वंदना अरुण सोनवणे
श्री.इंजि.पियुष प्रकाश सोनवणे
डॉ.ऐश्वर्या पियुष सोनवणे
डॉ.प्रणाली शुभंकर जठार-सोनवणे

श्री.एन.एस.साळुंके
प्रशासकीय अधिकारी, खा.एज्यु.सोसा.तामसवाडी
श्रीमती.मिराबाई भिकनराव जगताप
सौ.सुनंदाबाई यशवंत जगताप
श्रीमती.ताराबाई प्रकाश शिंदे
सौ.सरला पुंडलीक चित्ते
सौ.मयुरी आकाश गरुड
चि.स्वप्नील अरुण सोनवणे

खान्देश एज्यूकेशन सोसा.संचलित
मुख्याध्यापक - शिक्षक शिक्षकेतर वृंद माध्यमिक विद्यालय
तामसवाडी व राईनपाडा ता.साक्री जि.धुळे

# आपला महाराष्ट्र

## मेरी आवाजही पहचान है,गर याद रहे .,!

सुप्रसिद्ध पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे परवा वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. शतकाच्या जवळ जातानाच त्यांनी जगाचा निरोप घेतला.व्यावहारिक अर्थाने त्या भरपूर आणि समाधानी जगल्या.संगीत हा त्यांचा प्राण होता.अखेर पर्यंत अत्यंत निष्ठेने त्यांनी पार्श्वगायन केले.महाराष्ट्रातील घराघरात दोन तीन पिढ्यांनी त्यांची गाणी ऐकलेली आहेत. त्या भारताच्या एक अत्यंत दिग्गज आणि लोकप्रिय पार्श्वगायिका होत्या. त्यांनी मराठी, हिंदी, बंगाली, आणि गुजराती अशा अनेक भाषांमध्ये हजारो अजरामर गाणी गायली आहेत. त्यांच्या मखमली आणि भावपूर्ण आवाजाने अनेक दशके रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले, पार्श्व गायनाची कारकीर्द त्यांनी वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी १९५४ मध्ये सुरू केली. मंगू या हिंदी चित्रपटासाठी त्यांनी पहिले गाणे (कोई पुकारे धीरे से तुझे) गायले.त्यांचा आवाज भारतरत्न लता मंगेशकर यांच्याशी खूप मिळता जुळता होता, त्यामुळे अनेकदा श्रोत्यांना त्यांची गाणी लता दीदींची आहेत असा भास व्हायचा.प्रसिद्ध संगीतकार शंकर–जयकिशन, ओ. पी. मी नय्यर, मदन मोहन आणि मराठीत सुधीर फडके, वसंत प्रभू, हृदयनाथ मंगेशकर अशा दिग्गज संगीतकारां सोबत त्यांनी काम केले.सुमन कल्याणपूर यांनी गायलेली अनेक मराठी भावगीते, चित्रपटगीते आणि भजने आजही लोकप्रिय आहेत. त्यातील काही प्रमुख गाणी सांज आली दारातुनी. नाविका रे वारा वाहे रे... घाल घाल पिंगा वाऱ्या. कशी गवळण राधा बावरली. निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई. जिथे सागरा धरणी मिळते अशा प्रकारे त्यांनी सिने गीते, भावगीते, भजन, अंगाई असे कला प्रकार हाताळले.मराठी व हिंदी संगीत सृष्टीतील त्यांच्या अफाट योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.२०२३ मध्ये भारत सरकारने कलाक्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेऊन त्यांना देशाच्या तिसऱ्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले होते .त्यांनी गायलेली अजरामर गाणी आणि त्यांचा मखमली आवाज घराघरात रेडिओने पोहोचविला . रामानंद कल्याणपूर यांच्याशी लग्न होऊन त्या सुमन कल्याणपूर या नावाने सर्व परिचित झाल्या.

मराठी भावगीते तसेच सिने–संगीतात सुमन कल्याणपूर या गायिकेचे योगदान फार मोठे आहे.त्यांचे नाव निवेदकाने सांगितल्या नंतरच त्यांचे गाणे कळत असे ईतके त्यांच्या आणि लताताईंच्या आवाजात साधर्म्य होते.भल्या भल्यांना आकलन होत नसे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.सुमन कल्याणपूर यांची कारकीर्द १९५४ मध्ये सुरू झाली आणि ती आजतागायत सुरूच होती.मराठी माणसाच्या मनात सुमनताईंनी स्वत:चे घर केले होते.नाम गुम जायेगा,चेहरा ये बदल जायेगा,मेरी आवाज ही पहचान है,गर याद रहे असे एक गाणे किनारा चित्रपटात असून ते खूप लोकप्रिय आहे.त्या गाण्यातील शब्द न शब्द गायक,गायिकांच्या योगदानाबद्दल लागू पडतात.जगात करोडो लोक वास्तव्य करतात,त्यांचे जगणे सर्व सामान्य असल्याने त्यांच्या अस्ता नंतर फारशी नोंद घेतली जात नाही. मात्र विविध कलावंत,विचारवंत,तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ,संशोधक ,नेते यांची नोंद इतिहासात होते.ते समाजात दीर्घकाळ नावाने उरलेले असतात.त्याचप्रमाणे गायक गायिकांचे असते. त्यांचा आवाज उरलेला असतो.तो पिढ्यान पिढ्या गुंजत असतो.सुमन कल्याणपूर त्या अर्थाने अजरामर आहेत.दिग्गज गायक महंमद रफी, किशोरकुमार, मुकेश, मन्ना डे, महेंद्र कपूर, गायिका लताताई मंगेशकर,आशाताई भोसले आवाजाच्या रूपात आपल्यात आहेत. शास्त्रीय गायक गायिका सुध्दा असंख्य ख्यातनाम असून तिसरी पिढी त्यांच्या गाण्यांचा आस्वाद घेत आहे. सर्व पिढ्यांमध्ये महंमद् रफी, किशोर कुमार लता मंगेशकर, अशा भोसले प्रिय आहेत. श्रोत्यांना त्यांची गाणी ऐकून समाधान मिळते,आनंद् मिळतो.

धावपळीच्या,दगदगीच्या रोजच्या जगण्यात पुष्कळ दु,:ख भरलेले असते. त्यावर मात करायची असेल तर गाणे ऐकणे हा उत्तम उपाय आहे.वर उल्लेख केलेल्या गायक गायिकांच्या आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून सोडले आहे .त्यात अग्रभागी असलेले एक नाव सुमन कल्याणपूर यांचे आहे.गाय झोपली गोठ्यात घरट्यात चिऊताई,निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई अशी अंगाई गीते एकेकाळी घराघरात ऐकली जात. बाळांना झोपवताना माता ती गाणी गुणगुणत असत एवढा त्या गीतांचा प्रभाव होता.रेडिओवर हमखास वाजविली जाणारी ही गाणी आजही तितक्याच आवडीने वाजविली, ऐकली जातात. म्हणूनच मेरी आवाजही पहचान है,गर याद रहे असे म्हटलेले आहे.त्यांनी कले बद्दल बोलताना जे म्हटलेले आहे ते अत्यंत मोलाचे आहे. देवाने दिलेली विद्या व कला कलावंताने निष्ठेने जोपासायला हवी. कला ही अत्यंत पवित्र गोष्ट आहे. आपल सारं आयुष्य पणाला लावून कलावंत आपल्या कलेची वास्तू कणा–कणाणे उभी करीत असतो.आपल्या कुठल्याही अनिष्ट कृतीने तिला तडा जाणार नाही, याची काळजी त्याने स्वत: घ्यायला हवी, हेच माझे जीवनाचे तत्वज्ञान आहे.सूर तेच पती, सूर तेच देवा, सुरांच्या विणल्या मी येथे गोधड्या. या ओळींप्रमाणे त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सुरांच्या सेवेत व्यतीत केले. सुमन कल्याणपूर यांचे शरीर आज आपल्यात नसले, तरी त्यांनी मागे ठेवलेला स्वरांचा दैवी वारसा आणि अमिट सुगंध संगीताच्या दुनियेत सदैव जिवंत राहील.

'तिन्ही साजा गाता गाणी असा त्यांचा प्रत्येक स्वर मनाचा ठाव घेणारा आहे. त्यांनी गायलेली गाणी हे केवळ मनोरंजन नव्हते तर तो भाव भावनांचा सुगंधीत आलेख होता.रफी साहेब,मन्ना डे आणि मुकेश यांच्या सोबत त्यांनी अनेक द्वंद गीते गायिली आहेत. त्यातील काही गाणी सुवर्ण काळाची आठवण करून देतात .मराठी सुगम संगीतातील त्यांनी जोडलेले सूर रसिकांच्या मनात खोलवर रूजलेले आहेत. शब्दांवाचून कळले सारे , अशा गाण्यातील त्यांचे स्वर मनाचा ठाव घेणारे आहेत तो ठेवा आवाज रूपाने आपल्याला उपलब्ध आहे त्यांच्या मधुर, कोमल आणि विलक्षण भावस्पर्शी आवाजाने अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले. हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील त्यांचे असणे आश्वासक होते. तर मराठी भावगीतांच्या विश्वात त्यांनी आपल्या सुरेलतेची अमिट छाप उमटवली.त्यांच्या गायकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्वरांतील निर्मळता, उच्चारांतील स्पष्टता आणि भावनांची अत्यंत संयत पण प्रभावी अभिव्यक्ती. कोणत्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा किंवा कृत्रिमता न आणता त्या गीताचा भाव श्रोत्यांपर्यंत पोहोचवत असत. त्यांच्या आवाजातील कोमलता सुगमता यामुळे अनेकदा त्यांची गाणी ऐकताना एक विलक्षण प्रसन्नता आणि शांततेचा अनुभव येतो.

ना तुम हमें जानो,आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे,बहना ने भाई की कलाई पे,दिल ने फिर याद किया यांसारखी अजरामर हिंदी गाणी तसेच मृदुल करांनी छेडित तारा,केतकीच्या बनी तिथे,नाविका रे वारा वाहे रे यांसारख्या मराठी गीतांनी रसिकांच्या हृदयात कायमचे स्थान मिळवले.

विनम्रता, प्रसिद्धीपासून दूर राहण्याची वृत्ती आणि केवळ कलेशी असलेली त्यांची निष्ठा ही देखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. सात दशकांहून अधिक काळ त्यांनी आपल्या स्वरांनी भारतीय संगीतसृष्टी समृद्ध केली. त्यांच्या गीतांचा सुगंध आणि स्वरांचे चिरंतन माधुर्य पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. संगीत विश्वातील या महान स्वरयोगिनीला प्रणाम.

## पटेल फार्मसी मध्ये अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**शिरपूर, दि.१(प्रतिनिधी)- एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालयात पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एस. बी. बारी यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उल्हास पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याविषयी मार्गदर्शन केले. न्यायप्रिय राज्यकारभार, लोककल्याणाची तळमळ, स्त्रीशिक्षणाला दिलेले प्रोत्साहन तसेच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रथम वर्ष पदवीचा विद्यार्थी मयूर सूर्यवंशी याने आपल्या भाषणात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रेरणादायी कारकीर्द बद्दल सर्वांना जागरूक केले. अहिल्याबाई होळकर या मालवा संस्थानच्या आदर्श शासक म्हणून ओळखल्या जातात.

पान १ वरुन

## फेरीवाल्यांवर महापालिकेची कारवाई

टाकावा व महानगरपालिकेच्या घंटागाडीमध्ये देण्यात यावा अन्यथा आपल्यावर कारवाई करण्यात येईल. असा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे. शहरातील साक्री रोड परिसरात फेरीवाल्यांवर कारवाई करतांना सहा. आयुक्त डॉ. सोनाली देवरेंसह मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, लक्ष्मण पाटील, स्वच्छता निरीक्षक संदीप मोरे, विकास साळवे, संदीप वाघ मुकादम जयकिशन पिवाल यांचे पथक उपस्थित होते.

## धरण व शिवार गाळमुक्तीचे फायदे शेतकऱ्यांना होणार

या योजनेमुळे पर्यावरणीय दृष्टीनेही अनेक फायदे होत आहेत. जलाशय स्वच्छ राहिल्यामुळे पाण्याची गुणवत्ता सुधारते, तसेच परिसरातील जैवविविधता आणि परिसंस्थेला पोषक वातावरण निर्माण होते. काही ठिकाणी मत्स्य व्यवसायालाही या उपक्रमामुळे चालना मिळत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, या योजनेत लोकसहभागाला मोठे महत्त्व दिले जात आहे. ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था आणि शेतकरी गट यांच्या सक्रिय सहभागामुळे कामांना गती मिळत आहे. काही गावांमध्ये श्रमदानातूनही गाळ उपसा करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक यंत्रसामग्री, नियोजन आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जात आहे. योजनेअंतर्गत गाळ काढण्यासाठी तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरणासाठी यंत्रसामग्री आणि इंधन खर्चापोटी प्रति घनमीटर ३१रुपये दराने अनुदान दिले जात आहे. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत गाळ वाहून नेणाऱ्या पात्र शेतकरी लाभार्थ्यांना प्रति घनमीटर ३५.७५ रुपये या दराने, प्रति एकर कमाल १५ हजार रुपये मर्यादेपर्यंत अनुदान मिळणार आहे. अत्यल्पभूधारक (१ हेक्टरपर्यंत) आणि लहान शेतकरी (१ ते २ हेक्टरपर्यंत) यांना हे अनुदान अडीच एकरपर्यंत म्हणजेच कमाल ३७ हजार ५०० रुपये मिळू शकते. तसेच विधवा, दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे बहुभूधारक असली तरीही या अनुदानासाठी पात्र राहणार आहेत. यंदा नंदुरबार जिल्ह्यातील ३३ जलसाठ्यांमधून १० लक्ष ३७ हजार २६३ घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामुळे सुमारे १.०३७ दलघमी साठवण क्षमता पुन्हा उपलब्ध होणार आहे. तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेअंतर्गत ५१ नाल्यांमधून ८ लक्ष ३ हजार २२३ घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यातून १८४ कोटी लिटर जलसाठा क्षमता पुनर्स्थापित होणार आहे.

### जलसंधारणासोबत शाश्वत शेतीसाठी उपयुक्त- जिल्हाधिकारी

ही योजना केवळ जलसंधारणापुरती मर्यादित नसून शाश्वत शेतीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन त्याचा लाभ घ्यावा. तसेच संबंधित स्वयंसेवी संस्थांनी निर्धारित कालावधीत कामे पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिल्या आहेत. अधीक्षक अभियंता हरिभाऊ गिते यांनी सांगितले की, जिल्ह्यात सुरू असलेल्या या उपक्रमामुळे जलव्यवस्थापन अधिक सक्षम होत असून शेती क्षेत्राला नवी दिशा मिळत आहे. भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि शाश्वत विकास साधण्यासाठी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

## शिक्षकासह एकाला लुटणाऱ्या टोळीतील एकास पकडले

माध्यमातून एक लाख सहा हजार रुपये त्यांच्या अकाउंटवर ट्रान्सफर केले. सोबत आलेल्या मित्राकडील ९ हजार ५०० रुपये, २५ ग्रॅमची चांदीची चेन, २ चार्जर, दोघांचे मोबाईल हिसकावले. त्यानंतर संशयित मारेकरी बारा ते चौदा जण पसार झाले. या प्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात चौदा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

### एलसीबीकडून तपास

स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनिय माहितीचे आधारे सहाय्यक निरीक्षक नामदेव सहारे पोलिसांचे पथक तयार केले. त्यांना योग्य त्या सुचना व मार्गदर्शन करुन आरोपीचा शोधासाठी रवाना केले. पथकाने संशयित मंगेश भय्या कढरे, (वय२५) रा. भामेर ता. साक्री यास भामेर येथून ताब्यात घेत सखोल विचारपुस केली. त्याने गुन्हयाची कबुली दिली, त्याचा मित्र बाळुशेठ ऊर्फ राकेश सजनसिंग भोसले रा. जामदे ता. साक्री सोशल मीडियाच्या इंस्टाग्राम अकाऊंटच्या माध्यमातुन एक लाखाचे तीन लाख बदलुन देतो, असे रिल्स अपलोड केले होते. संशयीत दोघांसह सहा मोटर सायकलवर १२ ते १४ जण आले. मंगेशचा सहआरोपी मुकेश प्रकाश भामरे रा. भामेर ता.साक्री निजामपूर येथील एक पेट्रोल पंपावर कामास आहे, त्याचा मोबाईलवर ऑनलाइन रक्कम पाठविण्यात आली होती, ती रक्कम बाळुशेठ ऊर्फ राकेश भोसले यास खोरी गावाजवळ देण्यात आली. लूटमार करणाऱ्या टोळीतील तीन जणांची नावे अवघ्या आठ तासात पोलिसांनी निष्पन्न केले. त्यातील एकाला अटक करून निजामपूर पोलिसांच्या स्वाधीन केले. उर्वरीत आरोपींचा कसुन शोध घेण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, सहाय्यक निरीक्षक नामदेव सहारे, हवालदार सदेसिंग चव्हाण, पंकज खैरमोडे, तुषार सुर्यवंशी, महेंद्र सपकाळ, अतुल निकम, योगेश जगताप, संजय सुरसे यांनी कारवाई केली.

## पेट्रोल,डिझेलची दरवाढ रद्द करा भाकपासह किसान सभेची मागणी



**धुळे, दि.१- केंद्रसरकाने पेट्रोल, डिझेल इंधन दरवाढ तात्काळ रद्द करावी. या मागणीसाठी धुळे जिल्हा भारतीय कम्युनिस्ट पक्ष व धुळे जिल्हा महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्रभर राज्यव्यापी आंदोलन केले. तसेच इंधन दरवाढसंदर्भात केंद्रासह राज्य सरकारला जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून निवेदन दिले.**

निवेदनात नमुद केले आहे की, पेट्रोल, डिझेल ,गॅस, दरवाढीमुळे जीवनाशक वस्तूंच्या किमतीत वाढ होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला अतिशय कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. आठ दिवसात चार वेळा इंधन दरात वाढ करण्यात आले आहे. आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याचा सर्व भार सामान्य जनतेवर पडणार आहे. अगोदरच महागाईने जनता त्रस्त आहे त्यात इंधन दरवाढीची भर पडली आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष तसेच किसान सभेच्यावतीने केलेल्या मागण्यांमध्ये पेट्रोल, डिझेल, गॅस, इंधन दरवाढ मागे घेण्यात यावी. सामान्य जनतेच्या विचार करून वाढत्या महागाईला आळा घाला. शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरला सवलतीच्या दराने हवे तेवढे डिझेल देण्यात यावे. कारण शेतीचे यात्रिकिकरण झाल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून बहुसंख्य कामे ट्रॅक्टरच्या मदतीने होत आहेत. परिणामी शेतीपयोगी जनावरांची संख्या कमी झाली आहे. खरीप हंगाम तोंडावर असलयामुळे आता पूर्व मशागतीची कामे आणि हंगामातील कामे ट्रॅक्टरच्या मदतीनेच होणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळणे आवश्यक आहे. डिझेल आणि पेट्रलची दरवाढ रद्द करतांनाच शेतकऱ्यांना स्वस्त दरात खताचा पुरवठा करावा. आदी मागण्यांचा समावेश आहे. निवेदन देतांना धुळे भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड वसंतराव पाटील, कॉम्रेड साहेबराव पाटील, कॉम्रेड हिरालाल सापे, कॉम्रेड पोपटराव चौधरी, काम्रेड संदीप पाटील, कॉम्रेड बापू गर्दे, कॉम्रेड सुधाकर पाटील, कॉम्रेड नाना पाटील. कॉम्रेड शंकरराव पाटील .कॉ पितांबर पाटील उपस्थित होते.

## आई माझी मायेचा सागर.....

२ जून २००९ रोजी साक्री, धुळे येथे माझा लहान भाऊ अरुण याच्याकडे संध्याकाळी माझ्या आईचे दु:खद निधन झाले. ती कॅन्सर या रोगाने आजारी होती. आणी त्या आजारात तिचे दु:खद निधन झाल्यामुळे रात्रीच तिला प्रेताग्नि द्यावा असे काहींनी सुचवले. मात्र आईने प्राणत्याग केल्यावर त्वरित तिला न्यावे हे मला पटले नाही. ती काही वेळापूर्वी जिवंत होती आणी तिने प्राण सोडल्यावर तिला काही तासात स्मशानभूमीत न्यावे व तिचे अस्तित्व नष्ठ करावे हे मला मान्य नव्हते, म्हणुन दुसऱ्या दिवशी सकाळी ८/९ वाजता तिला स्मशानभूमीत न्यावे



असा निर्णय मी घेतला. माझ्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. आबासाहेब साळुंके यांनी त्वरित बर्फाची पेटी उपलब्ध करून आणली व रात्रभर आम्ही आईची काळजी घेतली. मनभरेपर्यंत रात्रभर मी तिच्याकडे पाहून घेतले. मनातल्या मनात मी तिच्याशी बोललो व दुसऱ्या दिवशी सकाळी सन्मानाने तिला निरोप दिला. सर्व सोपस्कार आटोपल्यावर आप्तेष्टांसह घरी आलो. माझे सांत्वन करणारे नातेवाईक व इतर मंडळी काही वेळात आमचे भावंडांचे सांत्वन करून सर्वच आपआपल्या घराकडे निघाले. काही तासातच आमचे घर खाली झाले. घरात फक्त माझे घरचेच होते. घरात बहिणी रडत होत्या म्हणुन मी बाहेर दारात बसलो. त्याच वेळेस मला काही हवे होते म्हणुन मी आत घरात डोकावलो व आईला हाक मारावी या उद्देशाने मी घरात मान वळवली असता घरात आई नाही, याची मला त्या क्षणी तीव्रतेने जाणीव झाली आणि मी भानावर आलो ! 'घरात आई नाही' आणी मला कळले की आता यापुढील आयुष्यात आई, मा अहिराणीतील माडी म्हणतात तो शब्द/ ती हाक आता मी मारू शकत नाही ! आणि खरच आज पावतो हे शब्द माझ्या तोंडी आले नाहीत !!! ते गेलेत ते कायमचेच ! म्हणुन मित्रहो, आई आहे तोपर्यंत आईस हाक मारून घ्या !! एकदा आई गेली की पुन्हा आई मिळत नाही. बाजारात सर्व मिळते पण आई नाही मिळत ! आई म्हणजेच देवाचे रूप आहे. ज्याला कळले तो भाग्यवान आणि ज्याला कळलेच नाही तो मनुष्याच्या जन्मास येऊन कपाळ करंटा !!!

आम्ही ६ भावंडे. २ भाऊ ४ बहिणी. माझी मोठी बहिण नंतर मीच ! वडिलांचा व्यवसाय हा लोहारकी चा ! बलुतेदारी !! शेतकऱ्याला पिकले तर बलुतेदारांना मिळणार नाहीतर, शेतकरी देणार कुठून ?? १९७० ते ८० सालाच्या दुष्काळात आमचे बालपण गेले. अमेरिकेतील लाल मिलो खाल्ला. घरात जर २ किंवा ३ भाकरीचे पीठ असेल तर लहान भावंडानी अगोदर खायचे, उरले तर मोठ्यांनी आणि आईवडील यांनी उपाशीच झोपायचे असेही दिवस पाहिलेत. आखाडी च्या दिवसात तर घरात धान्याचा दाणा नाही. २ दिवस मुले घरात उपाशीच. आईचे हृदय पिळवटून जायचे, उपाशीपोटी मुले झोपली हे तिला पहावेना ! गल्लीतून कुणाकडून तरी पदर पसरून अर्धा शेर बाजरी मिळवायची.ती रात्री पाण्यात भिजवायची, सकाळी ती बाजरी पाण्यात टाकल्याने पातेलेभर व्हायची. चुलीवर थोडे शिजवले की थोडे तिखट मीठ टाकून तयार करायची. आम्ही उपाशी पोटी असल्याने झोप लागेना. तेव्हा आम्ही सगळेच सकाळी लवकर उठून आईने बनवलेले बाजरीचे ढासले पोटात अधाशासारखे ओतायचो, तद्नंतर आमची आई व वडील ही खायचे व त्याच समाधानाने आम्ही भावंडे मराठी शाळेत जात असू. मात्र पुन्हा जेवण मिळेल की नाही या चिंतेने !! आई आमची अशिक्षित ! तिच्या भावंडांचा सांभाळ करण्यासाठी तिला शिकू दिले नाही. कुमारवयात लग्न झाले आणि नशिबात नवरा मिळाला तो लोहार. म्हणजे जन्मापासूनच ती कमनशिबी होती !!. घरात १८ वर्षे दारिद्र्य, पोटी ६ मुले, नवरा हा आईवडिलांच्या प्रेमात! बलुतेदारी करून मिळणारे धान्य सर्वच आई वडीलांना देणार, मग या ६ मुलांना खायला काय देऊ असा प्रश्न तिच्या समोर असे, त्यामुळे त्यांच्यात भांडणे होत आणि शेवटी नवरा प्रचंड मारहाण करी !! मारहाण ही निष्ठूरपणे बेदम असे. लहानपणी आईला मार खाताना आम्ही बघितले आहे, इतके दुर्दैवी आम्ही. अंगावर धड साडी नाही. वर्षाकाठी दिवाळीत १ साडी. १ नवी व १ जुनी. जुनी साडी ४ ठिकाणी फाटलेली. त्यातच ती राहिली. खर म्हणजे तिने त्या काळी नवऱ्याच्या त्रासाने आपले जीवन संपवले पाहिजे होते, मात्र मुलांच्या प्रेमापोटी ते, ती करू शकली नाही. जिवंत मरण ती जगली. तिचे सर्वच भाऊ मोठे झाल्यावर चांगल्या नोकरीस लागले मात्र आपल्या बहिणीचा संसार सुखी व्हावा याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

**- प्रा. प्रकाश सोनवणे**
माजी उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय, भवंस कॉलेज, अंधेरी, पश्चिम - मुंबई ५८
(शेवाळी, ता.साक्री, धुळे)


### प्रकाश में आज
## हिरा मोती




शत्रुघ्न सिन्हा, रिना रॉय, डेनी, अजीत, बिट्टु


## शब्दकोडे क्रमांक : २३८०



**आडवे शब्द :** १. कोणतेही रोजगार नसलेला ४. गुरांना बांधावयाची दोरी ६.लहान ८.अंगावरील बारीक केस ९.खार चवीचा,समुद्राच्या पाण्याची चव १०.साधना करणारा ११.टिकाव १३. झोपडी १५.आमिर खानचा एक सिनेमा १७.अलमारी १९.इंग्रजीत चहा २१.सज्जड दम २४.परमेश्वर २५.हिंदीत डाळ २६.एक सुवासिक फूल २८.पटांगण ३०.पलीकडे ३१.सतत पिच्छा पुरवणे ३३.छत ३४.द्रव पदार्थ मोजण्याचे एकक ३६.विश्रांती ३७.सागरात मिळते ती पुज्यनीय वस्तू ३९.शेरोशायरीने भरलेला गाण्याचा एक प्रकार ४२.भित्रा ४४.चुकीचा ४५.लज्जा ४७.पैलवानाचे खाद्य ४९.एक संवेदनशील इंद्रिया ५०.रात्री रस्त्याची होणारी दिशाभूल ५२.हल्ला ५३.राजवाडा ५५.एक बिन वासाचे फुल ५६.सप्त ५७.तो विरुद्ध

**उभे शब्द :** १.मिळवण्याची क्रिया २.पाणी ३.गावठी ४.कवाड ५.फुकटची बडबड ६.साधक करतात ७.कन उलट लिहा ९.कसाई १२.एक सुती कपड्याचा प्रकार १६.सागरांच्या लाटांचा नाद १८.वड्यासोबत खाल्ला जातो तो २०.शेत २१.सदैव फुलणारे एक फुल २२.देह २३.नेहमी २६.मयूर २७.रात्री उमलणारे एक फुल २८. पिठाचा एक प्रकार २९.चंचल ३०.एक लहान आकाराचा पक्षी ३२.कर्म ३५.रायगडावरील एक टोक ३८.किराणा सामान मिळते ते ठिकाण ४०.परमेश्वराचे अगाध कार्य ४१.चाकू रेतीवर रेघोट्या ओढून भविष्य पाहण्याची एक क्रिया ४४.पठन ४६.विष ४७.उलगडा ४८.हिंदीत कमी ५१.वायू ५४.वेस

### शब्दकोडे क्रमांक : २३७९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुं | ब | ई | | सा | ल | | पा | रं | पा | री | क |
| गी | | श्व | स | न | | अ | ल | ग | | त | मा |
| | पा | र | ध | | ला | च | | त | ल | | ल |
| ट | क | | न | ड | | ल | हू | | ग | हू | |
| पा | ळी | व | | र | ग | | ल | ला | ट | | सा |
| ल | | न | ग | | ट | न | | ल | | सा | व |
| | ना | रा | | क | | ल | क | | चि | व | ट |
| सा | | ज | व | ळी | क | | ला | भ | | ली | |
| ह | म | | डा | | ल | ढा | ई | | चा | | दा |
| स | ज | ग | | प | | ल | | आ | क | ल | न |
| | बू | | ता | री | ख | | तो | व | र | | शू |
| का | त | र | | स | ल | ग | | ळा | | दी | र |







## पान १ वरुन

### शिक्षणाचा धंदा केले जाते तेव्हा ...

राहुल गांधी यांनी उत्तरपत्रिका तपासणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत केंद्र सरकार आणि सीबीएसई बोर्डावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी एक्स पोस्टवर लिहिले की, खिसे कापूंपासून सावध रहा. आज तो सीबीएसईच्या आत बसला आहे. सीबीएसईच्या चुकीमुळे तुमचे गुण चुकले तर तुम्हाला काय मिळते? एका मुलाला एका बिलासाठी, एका बरोबर उत्तरपत्रिकेसाठी दोन हजार पर्यंत पैसे द्यावे लागू शकतात. कल्पना करा जेव्हा चार लाख विद्यार्थ्यांनी असे अर्ज सादर केले आहेत, तेव्हा किती कमाई करत असेल. जेव्हा फोनवरून स्कॅनिंग केले जाते, तेव्हा चुकीचे मार्किंग अटळ असते. ते दुरुस्त करून घेण्याचा खर्च ते मुले भरत आहेत. सीबीएसईची चूक असताना मुलांना शिक्षा आणि सरकारची कमाई. राहुल गांधी सीबीएसईच्या बारावीच्या विद्यार्थ्यांना भेटले होते. त्यांनी त्यांच्यासोबतच्या संभाषणाचा दीड मिनिटांचा व्हिडिओ पोस्ट केला. त्या कॅप्शनमध्ये लिहिले होते, ज्या धाडसी तरुणांनी सीबीएसई आणि मोदी सरकारला साधे प्रश्न विचारले, त्यांना उत्तरांऐवजी अपमान मिळाला. व्हिडिओमध्ये विद्यार्थ्यांनी राहुल गांधींना सांगितले, उत्तरपत्रिकेबद्दल प्रश्न विचारल्याबद्दल आम्हाला देशद्रोही, डीप स्टेटचे एजंट (हेर), दहशतवादी आणि पाकिस्तानी म्हटले गेले.

### उष्णतेची लाट ओसरली देशात दिलासा मिळाला

२.४ मिमी पाऊस झाला. येथे कमाल तापमान ३६.३ अंश होते, जे सामान्यपेक्षा ३.९ अंश कमी आहे. किमान तापमान २४.७ अंश होते. उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस आणि खराब हवामानाफुळे केदारनाथ यात्रा तात्पुरती थांबवावी लागली. चंपावत येथील श्री रीठा साहिब गुरुद्वाराच्या वार्षिक जोड मेळ्या दरम्यान दुथडी भरून वाहणाऱ्या नदीत पन्नासहून अधिक भाविक अडकले होते, ज्यांना नंतर वाचवण्यात आले.राजस्थानच्या जैसलमेरमध्ये रविवार संध्याकाळी पुन्हा वाळूचे वादळ उठले. यामुळे दिवसा अंधार पसरला. याचा व्हीडीओही समोर आला आहे. ज्यात आकाशात दूरूनच धुळीचे लोट उठताना दिसले. जे हळूहळू पुढे सरकले. यापूर्वी शनिवारी दुपारी राजस्थानच्या पाच जिल्ह्यांमध्ये श्रीगंगानगर, बिकानेर, चुरू, हनुमानगड आणि सीकरमध्ये वाळूचे वादळ आले होते. याचा परिणाम सुमारे दोनशे चौरस किलोमीटर परिसरात जाणवला. वाळूच्या वादळाची सुरुवात हनुमानगड आणि श्रीगंगानगर येथून झाली होती. यादरम्यान ५६ किमी प्रतितास वेगाने वादळ आले.

### विधानपरिषदेच्या सतरा जागांसाठी लढती ठरल्यात

-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर (पोटनिवडणूक) येथे निवडणूक होत आहे. राज्यातील सतरा मतदारसंघातील प्रमुख लढतींचा विचार करता, सोलापूर मध्ये काँग्रेस मविआचे आदित्य फत्तेपूरकर विरुद्ध भाजप महायुतीचे राजेंद्र राऊत उमेदवार आहेत. याच प्रमाणे अहिल्यानगर मध्ये काँग्रेस मविआचे करण ससाणे विरुद्ध भाजप महायुतीचे प्राजक्त तनपुरे, ठाणे मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे अभिजीत पवार विरुद्ध शिवसेना महायुतीचे रविंद्र फाटक, जळगाव मध्ये शिवसेना ठाकरे मविआचे शरद तायडे विरुद्ध भाजप महायुतीचे नंदकिशोर महाजन, सांगली-सातारा मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे बाळासाहेब पाटील/अभयसिंह जगताप विरुद्ध भाजप धैर्यशील माने, नांदेड मध्ये काँग्रेस मविआचे रामदास पाटील विरुद्ध भाजप महायुतीचे अमर राजूरकर, यवतमाळ मध्ये काँग्रेस मविआचे साहेबराव कांबळे विरुद्ध शिवसेना महायुतीचे दुष्यंत चतुर्वेदी, पुणे मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे श्रीकांत पाटील विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे विक्रम काकडे, भंडारा-गोंदिया मध्ये काँग्रेस मविआचे दिलीप बनसोड विरुद्ध भाजप महायुतीचे अविनाश ब्राह्मणकर, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मध्ये शिवसेना ठाकरे गट विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अनिकेत तटकरे, नाशिक मध्ये मविआचा उमेदवार नाही, अपक्ष विरुद्ध शिवसेना महायुतीचे नरेंद्र दराडे, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली मध्ये काँग्रेस मविआचे शैलेश अग्रवाल विरुद्ध भाजप महायुतीचे अरुण लखान, अमरावती मध्ये काँग्रेस मविआचे हर्षदीप देशमुख विरुद्ध भाजप महायुतीचे प्रवीण पोटे, धाराशिव-लातूर-बीड मध्ये काँग्रेस मविआचे महेश देशमुख विरुद्ध भाजप महायुतीचे बसवराज पाटील, परभणी-हिंगोली मध्ये शिवसेना मविआचे डॉ. विवेक नावंदर विरुद्ध शिवसेना महायुतीचे सईद खान, छत्रपती संभाजीनगर-जालना मध्ये शिवसेना ठाकरे गट विरुद्ध भाजप किंवा शिवसेना. नागपूर (पोटनिवडणूक) मध्ये काँग्रेस मविआचे अतुल लोंढे विरुद्ध भाजप महायुतीचे डॉ. राजीव पोतदार उमेदवार आहेत.

### सर्वोच्च न्यायालयात पाच नवीन न्यायाधीश नियुक्त

जम्मू-कश्मीर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पल्ली यांचीही सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा मंत्रालयाने जारी केलेल्या या नव्या नियुक्त्यांमुळे सर्वोच्च न्यायालयाला पाच नवे न्यायाधीश मिळाले आहेत.

### इराणच्या रडार-ड्रोन नियंत्रण केंद्रांवर अमेरिकेकडून हल्ला

दोन ड्रोन पूर्णपणे नष्ट केले. या संपूर्ण मोहिमेत अमेरिकेचे कोणतेही लष्करी जवान जखमी झाले नसल्याचे वॉशिंग्टनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दुसरीकडे, इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने या हल्ल्याला दुजोरा दिला असून अमेरिकेला प्रत्युत्तर दिल्याचा दावा केला आहे. सिरिक बेटावरील दूरसंचार टॉवरवर झालेल्या अमेरिकन हल्ल्याचा बदला म्हणून इराणच्या हवाई दलाने अमेरिकेच्या एका हवाई तळाला लक्ष्य केल्याचे आयआरजीसीने सोमवारी सांगितले. मात्र, सुरक्षा कारणास्तव इराणने या हवाई तळाच्या अचूक ठिकाणाचा खुलासा केलेला नाही. गेल्या आठवड्यापासून दोन्ही देशांमध्ये एकमेकांवर प्रत्युत्तरात्मक हल्ले सुरू आहेत. अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकन लष्कराने होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इराणच्या ड्रोन तळांना लक्ष्य केले होते. त्यानंतर संतप्त झालेल्या इराणने अमेरिकेच्या तळावर हल्ला चढवला. एका बाजूला शांततेच्या आणि कराराच्या चर्चा सुरू असतानाच, दुसरीकडे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने आखाती देशांमधील तणाव कमालीचा वाढला आहे.

### अठ्ठावीस ई-बस धुळे शहरात दाखल होणार

सुरक्षित आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध होणार आहे. ई-बस सेवेमुळे वाहतुकीतील सोयी वाढण्याबरोबरच पर्यावरणपूरक वाहतुकीलाही चालना मिळणार आहे.डिझेलवर चालणाऱ्या पारंपरिक बसांच्या तुलनेत ई-बसमुळे वायू व ध्वनी प्रदूषणात घट होणार असून इंधन बचतीलाही हातभार लागणार आहे. त्यामुळे शहराच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण मानला जात आहे.पाहणीदरम्यान प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करून ई-बस सेवा नागरिकांसाठी लवकर सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली. आगामी काळात ई-बस सेवा सुरू झाल्यानंतर धुळे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला नवे स्वरूप प्राप्त होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या पाहणीवेळी महानगरपालिकेचे उप आयुक्त हेमंत निकम, कार्यकारी अभियंता चंद्रकांत उगले व संबंधित अधिकारी, अभियंते तसेच प्रकल्पाशी निगडित अधिकारी उपस्थित होते. तसेच काँग्रेस पक्षाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष युवराज आबा कारणकाळ, शहराध्यक्ष हाजी साबीर शेठ, ज्येष्ठ नेते रमेश अण्णा श्रीखंडे, पितांबर दादा महाले, आणि दिशा समिती सदस्य सुनील शिंदे उपस्थित होते.

### पावणे दोन लाखांची नशेची पावडर

आरोपीकडून एमडी ड्रग्जव्यतिरिक्त पाचशे रुपये जप्त केले. हवालदार गौतम सपकाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित रईस खान पठाण याच्याविरुद्ध आझादनगर पोलिस ठाण्यात गुन्हा एन.डी.पी.एस. ॲक्ट ८ (क), २२ (क) प्रमाणे गुन्हा दाखल झाला. पोलिस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधिक्षक अजय देवरे, निरीक्षक निवृत्ती पवार यांच्यासह पोलीस पथकाने कारवाई केली. उपनिरीक्षक समाधान सुरवाडे तपास करीत आहेत.



## नंदुरबार जि. केळी बोर्ड स्थापन करा पपईला मनरेगाचे अनुदान द्यावे

**शहादा, दि.०१ - पपई फळ पिकाला केळी फळ पिकाच्या धोरणाप्रमाणेच मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) अंतर्गत अनुदान देण्यात यावे, तसेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर होणारे केळीचे उत्पादन पाहता येथील केळीचे दर ठरवण्यासाठी जळगाव जिल्ह्याच्या धर्तीवर नंदुरबार जिल्ह्यासाठी स्वतंत्र केळी बोर्डाची स्थापना करण्यात यावी, अशी आग्रही मागणी नंदुरबार जिल्हा केळी, पपई फळ बागायतदार सहकारी संस्थेतर्फे करण्यात आली आहे.**

या संदर्भातील मागण्यांचे एक सविस्तर निवेदन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल यांना देण्यात आले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली बागायतदार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने ही भेट घेतली.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,केळी उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणेच पपई उत्पादक शेतकऱ्यांनाही मनरेगा अंतर्गत अनुदान देऊन आर्थिक दिलासा देण्यात यावा.नंदुरबार जिल्ह्यात केळीचे विक्रमी उत्पादन घेतले जाते. परंतु, दराबाबत होणारी कोंडी फुटण्यासाठी जळगाव जिल्ह्याप्रमाणेच नंदुरबारसाठी स्वतंत्र केळी बोर्ड स्थापन करावे, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेल.नंदुरबार जिल्ह्यातील पपई आणि केळी उत्पादक शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देत आहे. त्यांच्या हक्काचे दर आणि अनुदान मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. निवेदनाचा स्वीकार केल्यानंतर ना जयकुमार रावल यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी व मागण्या अत्यंत गांभीर्याने ऐकून घेतल्या. नंदुरबार जिल्ह्यातील केळी आणि पपई उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध असून, या मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन ना. रावल यांनी या शिष्टमंडळाला दिले.या प्रसंगी नंदुरबार जिल्हा केळी, पपई फळ बागायतदार सहकारी संस्थेचे विविध पदाधिकारी, कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि शहादा परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## कत्तलखाना सुरु करण्याच्या ठरावास भाजपा नगरसेवकांचा तीव्र निषेध

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- पालिकेच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत पधुवधगृह (कत्तलखाना) सुरु करण्याच्या ठरावाला भाजपाच्या नगरसेवकांनी तीव्र निषेध व्यक्त करीत सत्ताधाऱ्यां विरोधात घोषणाबाजी करुन सदर ठरावाला विरोध दर्शविला. तसेच सदर निवेदन भाजपाचे नगरसेवक पंकज चौधरी यांनी पालिका प्रशासनास दिले.**

निवेदनात पुढे म्हटले आहे की, आज एक जून रोजी नंदुरबार नगरपरिषदेची सर्वसाधरण सभेतील विषय क्रमांक सहा मंजुर करणेबाबत माझी आणि भाजपाच्या सर्व नगरसेवकांची तीव्र हरकत आहे. नंदुरबार नगरपरिषदेचे पशुवधगृह हे गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. असे असतांना देखील बेकायदेशीरपणे दुरुस्तीच्या नावाखाली सदर पशुवधगृह चालू करण्याचा माणस सत्ताधारी आणि प्रशासनाचा दिसून येत आहे. नंदुरबार शहरातील बंद अवस्थेत असलेले पशुवधगृह दाट लोकवस्तीत आहे. सदर परिसरात हिंदू व मुस्लीम धर्मातील लोकवस्ती आहे. सदर पशुवधगृह २०१५ साली चालू करण्याचा प्रयतक केला असता शहरात सामाजीक सलोखा बिघडून कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळेस मी स्वतः व शहरातील अनेक हिंदू बांधव उपोषणाला देखील बसले होते. सदर पशुवधगृह हे सुरु होवू नये म्हणून काही मुस्लीम बांधवांनी देखील प्रशासनाकडे लेखी हरकत नोंदवलेली होती. त्यावेळेस सदर पशुवधगृह चालु करणार नाही अशी लेखी हमी देखील प्रशासनाने दिलेली आहे. या सर्व बाबी ज्ञात असतांना देखील नंदुरबार नगरपरिषद बेकायदेशीरपणे पुन्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करीत आहे. राज्यात गोवंश हत्या बंदी केलेली आहे. तसा कायदा देखील शासनामार्फत पारीत करण्यात आलेला आहे. असे असतांना देखील शासन निर्णय व कायद्याकडे हेतुपुरस्सरपणे डोळेझाक करुन ठराव करण्याचा बेतात नगरपरिषद असल्याचे दिसून येत आहे. बंद अवस्थेत असलेल्या पशुवधगृह पुन्हा कार्यन्वीत केल्यास परिसरात रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. तसेच या ठिकाणाहून निघाणाऱ्या घाणीच्या व्यवस्थापणाचा प्रश्न निर्माण होईल. तरी अशा प्रकारचा कुठलाही निर्णय घाईघाईने घेऊ नये. अन्यथा या विरोधात सर्व भाजपा नगरसेवक व हिंदू समुदायाच्यावतीने तीव्र जनांदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देखील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी भाजपा नगरसेवक तथा विरोधी नेते हिरालाल चौधरी, गटनेते आनंद माळी, नगरसेवक चारुदत्त कळवणकर, नगरसेविका शोभा चौधरी, निता मराठे, सुषमा गावीत, सारीका माळी, प्रकाश भाई आदी उपस्थित होते.

## साक्री रोड परिसरात धाडसी घरफोडी

धुळे, दि.१- शहरातील साक्री रोडवरील अरुणकुमार वैद्य नगरमधील बंगल्यातून चोरट्यांनी सोने चांदीच्या दागिन्यांसह लाखोंची रोकड लांबविली. आज सकाळी उघडकीस आलेल्या घरफोडी नंतर रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

दरम्यान, गेल्या काही दिवसात चोरट्यांनी सातत्याने चोरी, घरफोडी करीत धुळे जिल्हा पोलीस प्रशासनाला आव्हान दिले आहे. अरुणकुमार वैद्य नगर (झुलेलाल सोसायटी)प्लॉट क्रमांक येथे किराणा व्यवसायीक मोहनलाल हरवाणी यांचा बंगला आहे. बंगल्यात गेल्या काही दिवसापासून रंग देण्याचे काम सुरु असून मालकाने शेजारीच भाड्याने घर घेतले आहे. बंगल्यावर त्यांचा मुलगा शंकर हा लक्ष ठेवण्यासाठी रात्री झोपायला जात होता. दोन दिवसांपुर्वी तो पतकीला आणण्यासाठी सासरी भोपाळ येथे गेला. त्यामुळे बंगल्यावर कोणीही नसल्याची संधी साधत चोरट्यांनी मध्यरात्री वॉशिंग एरियातून बंगल्यात प्रवेश केला. दुसऱ्या मजल्यावरील दरवाजा तोडून कपाटही फोडले. सोने, चांदीचे दागिने रोकड असा ऐवज चोरून नेला. आज सकाळी मालक मोहनलाल हरवाणी आले असता घरफोडी झाल्याचे निदर्शनास झाले. घटनेची माहिती मिळताच एलसीबीसह धुळे शहर पोलीस, ठसे तज्ज्ञ आणि श्वान पथकाला पाचारण करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली. सुमारे तोळे सोने, चार ते पाच लाखाची रोकड नेल्याची चर्चा आहे. परंतु सायंकाळी उशिरापर्यंत व्यापारी मोहनलाल हरवाणी किंवा कुटुंबीय कोणीही तक्रार देण्यास आलेले नव्हते, त्यामुळे नेमका किती ऐवज चोरी झाला हे अद्याप समजू शकलेले नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली.




## एसटीच्या वर्धापन दिनाचे औचित्य लालपरीचे संघटनांतर्फे भव्य स्वागत

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहीनी ठरलेली राज्य परिवहन महामंडळाची एसटी अर्थात लालपरीचा एक जून रोजी वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र प्रवासी महासंघ व ग्राहक पंचायततर्फे सन्मान करण्यात आला.**

राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीला एक जून रोजी ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्राहकतीर्थ स्व. बिंदू माधव जोशी प्रणित प्रवासी महासंघ नंदुरबार जिल्हा आणि ग्राहक पंचायत शाखेतर्फे आगारप्रमुख, स्थानक प्रमुख अधिकारी तसेच कर्तव्यावरील वाहक, चालकांचा सन्मान करण्यात आला. लालपरीच्या वर्धापन दिनानिमित्त प्रातिनिधीक स्वरूपात नंदुरबार-पुणे बस फुलमाळा आणि केळीच्या खांबांनी सजविण्यात आलेली होती. याप्रसंगी ग्राहक पंचायत प्रणित प्रवासी महासंघाचे नंदुरबार तालुका अध्यक्ष महादू हिरणवाळे यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीचा थोडक्यात लेखाजोखा मांडला. प्रवासी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश जैन यांच्या हस्ते आगार प्रमुख संदीप निकम यांचा पदोन्नतीबद्दल सन्मान करण्यात आला. तसेच लालपरीच्या वर्धापन दिनानिमित्त महिला वाहक करुणा पाटील, ज्योत्सका सैंदाणे, चालक रवींद्र जगताप, उमेश गवळे आणि उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास नंदुरबार आगारातील देवेंद्र सूर्यवंशी, रवींद्र जगताप, प्राचार्य बेडसे, ऋषिकेश पावरा, कुणाल तांबोळी, प्रवासी महासंघाचे ज्येष्ठ सदस्य बी.डी. गोसावी, सुरेखा वळवी, श्रद्धा पाटील, वैभव करवंदकर, डॉ. गणेश ढोले, वासूदेव माळी, राम ठक्कर, दर्शन ठक्कर तसेच प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### उषाबाई पाटील



धुळे, दि.१- जळगाव जिल्हा चोपडा तालुक्यातील धुपे बु।। येथील रहिवासी गं.भा.उषाबाई बन्सीलाल पाटील यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावाई असा परिवार आहे.

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी हुशार व होतकरु मुले/मुली फूलटाईम/पार्टटाईम त्वरीत पाहिजेत.
- समक्ष भेटा -
मुंदडा बुक स्टॉल
पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**शेती बटाईने देणे**
सर्व सोयींनी युक्त १ एकर कंपाऊंडसह देशी कोंबडी पालनसाठी व १४ एकर शेती बटाईने देणे आहे.
-: संपर्क :-
9403433767

**वीर सावरकर जयंती निमित्त शुभारंभ**
**वीर सावरकर अपार्टमेंट**
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट, 2 BHK - 1200 स्के.फुट, 3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**प्लॉट विकणे आहेत**
आर्वी NH-3 हायवेलगत केले नगर येथील गट नं.२२८ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत श्रीकृष्ण नगर येथील गट नं.२३२ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
आर्वी NH-3 हायवेलगत भगवती विहार येथील गट नं.२६५/३/१ या ले-आऊट मधील प्लॉट विकणे आहे.
संपर्क - 9422792677, 8888192677

**व्यवस्थापक पाहिजे**
श्री. जलाराम बापा मंदीर, धुळे नटराज टॉकीज मागे येथे ४० ते ५० वयोगटातील दांपत्यास रहाण्याची सोय मंदीराचे व्यवस्थापकनाची जबाबदारी सांभाळावी लागेल.
-: संपर्क :-
7588888124
9423411265

**पाहिजेत**
अनुभवी मॅनेजर, ड्रायव्हर वॉचमन (फॅमिलीसह)
अर्जासह समक्ष भेटा
सकाळी १० ते सायं.७
अनुभव असल्यास प्राधान्य
राधाकृष्ण मंगल कार्यालय
नकाणे रोड, रूपामाई शाळेजवळ, धुळे
मो.९३०९५३१६६५
९४२२२९६२०५

**पाहिजेत**
दवाखाना कामासाठी मुले-मुली पाहिजेत.
डॉ.महेंद्र शाह
ग.नं.५, धुळे
9284857455

**पाहिजे**
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे.
राधेकृष्ण ऑटो मोबाईल्स्
बारा पत्थर धुळे
8669067006
9420439551

**सेल्समन पाहिजे**
जिओ (Jio) कंपनीच्या ॲक्टिव्हिटी आणि मार्केटिंग कामासाठी
उमेदवाराकडे स्वत: स्मार्टफोन आणि वाहन असणे आवश्यक आहे.
इच्छुकांनी आपला बायोडेटा घेऊन खालील पत्यावर संपर्क साधावा.
श्री साई एजन्सी
राजमहाल बिल्डिंग, पारोळा रोड, धुळे -४२४००१ मो. - 7757899399

**ड्रायव्हर पाहिजे**
बर्फाच्या गाडीसाठी सकाळी लवकर येणारा ड्रायव्हर पाहिजे.
मुंदडा आईस फॅक्टरी
पारोळा रोड धुळे

**भाड्याने देणे**
बांबू गल्लीत पहिल्या मजला दर्शनी रस्त्याकडील १००० फुटी हॉल वैद्यकीय व्यवसायासाठी उपयुक्त.
8408958097

**अनारसे**
खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**WALK-IN-INTERVIEW**
DATE : 2nd, 3rd, 4th June 2026
Required Female Teacher
For Std. 1st to 10th
Teachers - 08 Post (Ladies)
D.Ed / B.Ed./ B.Sc / M.Sc/ B.A./ M.A.
- Address of Interview -
Horizon International School
Parola Road, Ajang, Dhule Mob. 9767636755
शिक्षकांसाठी ने-आण करण्यासाठी बसची (व्हॅनची) सुविधा आहे.

**पाहिजेत**
नर्स महिला ANM, GNM
वरदान लहान मुलांचे हॉस्पिटल
स्टेशन रोड, रेल्वे स्टेशन समोर, धुळे
-: संपर्क :-
9175496933
8390778336

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**
atomberg "Why not?"





क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०